

UGC Sponsored

One Day National Interdisciplinary Seminar

On

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS AT PRESENT ERA

Tuesday 14th March, 2017

Organized by

**Gandhian Study Centre**

Shri Gajanan Shikshan Prasarak Mandal's
(Linguistic Minority Institutions)
Toshniwal Arts, Commerce & Science College, Sengaon
Tq. Sengaon Dist. Hingoli-431542 (MS)

Affiliated to Swami Ramanand Teerth
Marathwada University, Nanded (MS)

(Re-accredited by NAAC with "B" Grade)

Chief Editor
Mr. S. G. Talnikar

Co-Editor
Dr. P. B. Patil

Scanned by CamScanner

Shri Gajanan Shikshan Prasarak Mandal's

(Linguistic Minority Institutions)

**Toshniwal Arts, Commerce & Science College, Sengaon**

Tq. Sengaon Dist. Hingoli-431542 (MS)

Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.(MS)

(Re-accredited by NAAC with "B" Grade)

UGC Sponsored

**One Day National Interdisciplinary Seminar**

**On**

# Relevance of Gandhian Thoughts at Present Era

Guided by

**Principal, Dr. S. M. Vadgule**


*Chief Editor*

**Mr. S. G. Talnikar**

Asso. Professor, Dept. of Political Science

*Co-Editor*

**Dr. P. B. Patil**

Asso. Professor Dept. of Economics


Organized by

**Gandhian Study Centre**

Scanned by CamScanner

"Relevance of Gandhian Thoughts at Present Era"

© Reserved

Publisher & Printer:
Academic Book Publications
'Dnyandeep' Appartement, Plot No.2, Chaitanya Nagar, Opp.Pragati School, Jalgaon – 425001.
Mob: 9665626717, 9421636460
E-mail : academicbooksjalgaon@gmail.com
Edition: 2017 ISBN: 978-93-85664-57-1
Typesetting: Academic Book Publications Price : ₹ 450/-

All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without prior written permission of the publisher.



Scanned by CamScanner

93. महात्मा गांधी यांच्या ग्राम स्वराज्य संकल्पनेची मिमांसा ............

प्रा. अनसुले प्रवीण आनंद

94. महात्मा गांधींचा अध्यात्मनिष्ठ मानवतावाद : एक विचार ............

प्रा. डॉ. नारायण तु. कांबळे

95. मजबूरी का नाम महात्मा गांधी नही। मजबुती का नाम महात्मा गांधी ............

डॉ. दत्तराव अम्बादास शिंदे

96. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास ............

प्रा. शिंदे एच.टी.

97. महात्मा गांधीजींचे स्त्रीविषयक विचार ............

प्रा. एस. पी. खुपसे

98. महात्मा गांधीजींचे जीवन आणि शिकवण ............

प्रा. शिलेश गोकुळ शेते

99. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता ............

प्रा. वसंत नानाराव पाने, प्रा. डॉ. एस. बी. पाते [redacted]

100. महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार ............

प्रा. फड एस.बी.

101. गांधी एक शिक्षा :- स्वच्छ भारत, स्वस्थ भारत ............

प्रा. प्रमोद चव्हाण

102. महात्मा गांधी आणि भारतीय राजकारण ............

प्रा.वाघमारे के.एच.

103. सर्वोदय व म. गांधीजी ............

डॉ.दत्तात्रेयराव एस.डी.

104. महात्मा गांधी आणि महिला सक्षमीकरण ............

डॉ.आर.व्ही. मोरे

105. महात्मा गांधीजींची अर्थनिती ............

प्रा. डॉ. मुकसुले बी. एस.

106. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार ............

प्रा. तळणीकर एस. जी.

107. राष्ट्रपिता बापूजी : एक थोर आदर्श ............

प्रा. यु. पी. सुपारे

108. महात्मा गांधीचे राजकीय विचार ............

प्रा. उबाळे पी. जे.

109. 21 व्या शतकात महात्मा गांधींचे विचार समग्र बदल घडविणारे ............

विजयकुमार बाळासाहेब काकडे

110. महात्मा गांधी यांचे संस्कारक्षम शैक्षणिक विचार : काळाची गरज ............

प्रा. गायकवाड बी. जे.

111. गांधी आणि भारतीय राजकारण ............

विनोद दत्तराव झाडे


Scanned by CamScanner

# महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता

प्रा. बसंत नानाराव पतो
संशोधक
अ.र. भा. गरुड कॉलेज शेंदुर्णी
ता. जामनेर जि. जळगाव

प्रा. डॉ. एस. बी. पाले
मार्गदर्शक
विभाग प्रमुख
अर्थशास्त्र विभाग
संत तुकाराम महाविद्यालय परभणी

**प्रस्तावना–**

महात्मा गांधीजींचे विचार आजही जगाला उपयुक्त आहेत. गांधीजींनी सर्वकालीन उपयुक्त असणाऱ्या विचारावरच सर्व जगावर आपला प्रभाव निर्माण केला आहे. महात्मा गांधीजींनी आपल्या अन्दोलनातून जगाला शांततेच्या मार्गानेही अनेक समस्या सोडवता येतात हे दाखवून दिले. महात्मा गांधीजींनी आपले आर्थिक विचार समन्वयी तत्वावर आधारित मांडले. गांधीजींच्या मते प्रत्येक व्यक्तीला जसे मोफत व जन्मत पाणी व हवा प्राप्त होते त्याच पद्धतीने जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी प्रत्येक गोष्ट मानवाला उपलब्ध झाली पाहिजे असे निसर्गवादावर आधारित आपले विचार मांडले. नैसर्गिक संसधानांचा आवश्यक वापरावरच गंधीजीनी भर दिला त्यांचा अनावश्यक व अतिरिक्त वापर टाळावा असे त्यांनी सूचित केले. ज्यामुळे भविष्यातील त्या संसाधनांच्या समस्या निर्माण होणार नाहीत आज जगात सततीय विकास संकल्पना राबवली जात आहे. हि संकल्पना म्हणजेच गांधीजींच्या विचारांचा एक भाग आहे गांधीजींनी ग्रामस्वराज्य हि संकल्पना मांडून स्वयंपूर्ण खेडे आपल्या अर्थव्यवस्थेचा आधार असतील असे विचार मांडून 'खेड्याकडे चला' असे आव्हान केले. आज भारतात 'पुन्हा खेड्याकडे चला' असे म्हणण्याची वेळ आली आहे. कारण आज खेडे ओस पडत आहेत.

गांधीजीनी स्वदेशीवर भर दिला व त्यातून स्वदेशी उद्योग समृद्ध केले. आज मुक्त अर्थव्यवस्थेत इंग्लंड, अमेरिका यासारखे देश पुन्हा राष्ट्रवादाकडून स्वदेशी उत्पादनाकडे चालले आहेत.या सर्व बाबींवरून गांधीजींच्या विचारातील वर्तमानता आपल्याला दिसून येते.

**उद्देश–**

१) महात्मा गांधीजींच्या विचारांतील वर्तमान काळातील उपयुक्तता अभ्यासणे.
२) महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.
३) गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना अभ्यासणे.
४) गांधीजींच्या स्वदेशी व औद्योगिकीकरण विषयक विचारांचे अध्ययन करणे.

**ग्रामस्वराज्य–**

महात्मा गांधीजीनी 'खेड्याकडे चला' या घोषणेतून खेड्यांचे महत्व अधोरेखित केले आहे. पूर्वी भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार खेडेच होती व सर्व खेडी हि स्वयंपूर्ण होती खेड्यांमध्ये द्रुषी व हस्तउद्योगाची भरभराट होती. प्रत्येक व्यक्ती, कुटुंब आनंदाने जीवन जगत होता पण सततच्या विदेशी आक्रमणांमुळे हि सुबत्ता नष्ट होत गेली व इंग्रजांच्या आगमनानंतर ही ग्रामीण व्यवस्थाच मोडीत निघाली. त्यामुळे खेड्यातील शेतकरी, लहान व्यावसायिक देशोधडीला लागले व ज्या देशातून सोन्याचा धूर निघतो असे वर्णन ज्या देशाचे केले जायचे तो देश गरीब, दरिद्री म्हणून ओळखला जाऊ लागला. भारताला जर गतवैभव प्राप्त करायचे असेल तर ते ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय शक्य नाही हे हेरूनच गांधीजींनी खेड्याच्या विकासाना प्राधान्य देण्याचे सूचित केले. ग्रामराज्य हेच खरे रामराज्य होय असे गांधीजी मानत खेडी हि स्वयंपूर्ण असावीत यासाठी गांधीजी आग्रही होते. स्वातंत्र्यानंतर मात्र काही काळ खेड्यांच्या



Scanned by CamScanner

विकासाकडे दुर्लक्ष झाले व खेडी विकास प्रक्रियेतून बाजूला फेकली गेली कालांतराने ग्रामीण भागाचे महत्व ओळखून ग्रामस्वराज्य हि संकल्पना पुन्हा मूळ धरू लागली. आज पुन्हा एकदा खेड्याकडे चला अशी वेळ आली असून ग्रामस्वराज्य हि संकल्पना प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. सर्व सोयींनी युक्त खेडी असतील यासाठी आंदोलने सुरु झाली असून भविष्यातील अडचणींचा सामना करण्यासाठी खेडी महत्वपूर्ण ठरणार आहेत म्हणूनच पुन्हा गांधीजींच्या विचारांना झळाळी मिळत आहे.

**उद्योग-**

गांधीजी औद्योगिकीकरणाच्या विचारासंदर्भात गांधीजी मोठ्या उद्योग व यांत्रिकीकरणाचे विरोधक होते असे म्हटले जाते पण वास्तवात मात्र महात्मा गांधीजींनी अनावश्यक असताना यांत्रिकीकरणाला विरोध केला. आपल्या देशात विपुल प्रमाणात श्रम शक्ती उपलब्ध असताना त्या श्रमाचा जास्तीत जास्त वापर करून देशात रोजगार निर्माण करण्यावर भर द्यावा असे स्पष्ट केले. गांधीजींनी कुटीर उद्योग व हस्तउद्योगावर अधिक भर देऊन ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य दिले. आज ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी कृषी आधारित उद्योगाची आवश्यकता आहे.महात्मा गांधीजींनी देशाच्या समान व सर्वांगीण विकास होण्यासाठी उद्योगांच्या विकेंद्रीकरणाला भर दिला. आज मात्र उद्योग्यांच्या केंद्रीकरणामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या समस्या सोडवण्यासाठी उद्योगाच्या विकेंद्रीकरणाची आवशकता आहे. भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत भांडवलाच्या कमतरतेमुळे मोठ्या उद्योगांसाठी विदेशी गुंतवणुकीवर भर द्यावा लागतो त्यामुळे लहान उद्योगांची निर्मिती केल्यास कमी भांडवलात ते उद्योग सुरु होऊन आर्थिक विकासाला चालना मिळेल.

**स्वदेशी चळवळ-**

गांधीजींनी स्वदेशी चळवळ सुरु केली व स्वदेशी वापरावर भर द्यायला सुरुवात झाली. यामुळे स्वदेशी उद्योजकांना चालना मिळाली. इंग्रजांमुळे भारतातील कापड उद्योग व कुटीर उद्योग लोप पावले. भारतातून कच्चा माल कमी किमतीत न्यायाचा व इंग्लंडमध्ये त्यावर प्रक्रिया करून तो जास्त किमतीला भारतात विकायचा आणि मिळालेले उत्पन्न इंग्लंडमध्ये पाठवायचे यामुळे भारतीय अर्थव्यवस्था कोलमडून गेली. भारतीय अर्थव्यवस्थेला पुन्हा उभारी देण्यासाठी व इंग्रजांच्या या लुटारू धोरणाला विरोध करण्यासाठी गांधीजींनी स्वदेशी चळवळ सुरु केली. आज मुक्त अर्थव्यवस्था व जागतिकीकरणामुळे सर्व अर्थव्यवस्थांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. या जागतिक बाजारपेठेचा लाभ मात्र काही मोजक्याच देशांना झाला आहे. चीनसारख्या देशांनी अवपुंजन करून विविध देशांच्या बाजारपेठा काबीज केल्या असून भारतीय बाजारपेठेवरही त्याचा मोठा प्रभाव दिसून येत आहे. त्याचा फटका हळू हळू स्वदेशी उद्योगांना बसत आहे. अनेक देशांनी मुक्त अर्थव्यवस्थेकडून संरक्षित अर्थव्यवस्थेला सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर स्वदेशी चळवळींची आवश्यकता आहे.

**समतेचे तत्व –**

गांधीजींनी समतेवर आधारित सर्वोदय ची संकल्पना मांडली देशातील प्रत्येक व्यक्तीने मालक म्हणून न राहता केवळ विश्वस्थाची भूमिका पार पाडावी व आवश्यक तेवढीच संपत्ती बाळगावी, देशातील प्रत्येक घटकाचा विकास समान न्याय पद्धतीने झाला पाहिजे असे गांधीजींनी मांडले. देशातील प्रत्येक व्यक्ती विकासाच्या मुख्य प्रवाहात असली पाहिजे अन्यथा देशात अनेक समस्या निर्माण होतील. देशातील प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र, निवारा व स्वच्छ पेयजल अडचणी शिवाय उपलब्ध झाले पाहिजे प्रत्येकाला आरोग्यसेवा व शिक्षण मोफत उपलब्ध झाले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला ऐहिक सुखापेक्षा मन स्वास्थ्य लाभणारे समाधान मिळाले पाहिजे, तरच आर्थिक समानता निर्माण होईल.

आज आपल्या देशात आर्थिक व प्रादेशिक विषमतेने उग्र रूप धारण केले आहे. देशात दारिद्र्य, बेकारी, कुपोषण या समस्या वाढत आहे. देशात गरीब व श्रीमंतातील दरी सतत वाढत आहे. देशातील २० टक्के लोकांकडे



Scanned by CamScanner

८० टक्के संपत्ती असून ८० टक्के लोकांकडे केवळ २० टक्के संपत्ती आहे. उत्पन्नातील हि विषमता कमी करण्यासाठी गांधीजींना अपेक्षित असलेल्या समतेच्या तत्वावर राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था चालणे आवश्यक आहे. म्हणजेच गांधीजींच्या विचारांची आजही देशाला व जगाला आवश्यकता आहे.

सर्व जग आज अशांतता व अराजकतेच्या खाईत लोटल्या जात आहे. प्रत्येक प्रश्न, समस्या ही सैन्य बळावर सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. यातून आतंकवाद, दहशतवाद वाढत आहे. हे नष्ट करण्यासाठी अहिंसात्मक मार्गाशिवाय पर्याय नाही.

**सारांश -**

महात्मा गांधीजींनी रक्तपाताशिवाय क्रांती होते हे आपल्या स्वातंत्र्य चळवळीतून दर्शवून दिले आहे. शांततेच्या मार्गातून संघर्ष अशी अमुल्य देणगी जगाला दिली. वेळेचे काटेकोर नियोजन व पैशांचा काटकसरीने वापर करण्याचा आदर्श जगाला घालून दिला. समता, बंधुता व स्वातंत्र्य या शिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही हे जगाला पटवून दिले. प्रत्येक व्यक्तीने जर विश्वस्ताची भूमिका पार पडली तर देशात वा जगात आपोआप समानता प्रस्थापित होऊन देशातील सर्व समस्यांचे निर्मुलन करता येईल ग्रामस्वराज्य, स्वदेशी चळवळ, समतेचे तत्व, विश्वस्त संकल्पना अशा अमूल्य देणग्या जगाला दिल्या आहेत, त्यांची नितांत आवश्यकता जगाला आहे. म्हणूनच महात्मा गांधीजी यांचे विचार वर्तमान काळातही उपयुक्त आहेत हेच यावरून स्पष्ट होते.

**संदर्भ-**

१) आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी
२) गांधी दर्शन मिमांसा - प्रकाश नारायण नातानी
३) जागतिक आर्थिक विचारवंत - प्रा. डॉ. एम. एस. खंदारे
४) संक्षिप्त आत्मकथा (मराठी) गांधीजी - नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदनगर

Scanned by CamScanner



3, Pratap Nagar, Shri Dyaneshwar Mandir Road,
Near Nutan Maratha College, Jalgaon 425 001
Ph: 0257-2232800, 2235520, 94216 36460, 96656 26717
Email: academicbooks@gmail.com

*visit us at* www.prashantpublications.com

ISBN 978-93-85664-57-1

Scanned by CamScanner

Shri Gajanan Shikshan Prasarak Mandal's
(Linguistic Minority Institution)

# Toshniwal Arts, Commerce & Science College, Sengaon

Tq. Sengaon Dist. Hingoli-431542 (MS)
Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
(Re-accredited by NAAC with "B" Grade)
UGC Sponsored

One Day National Interdisciplinary Seminar On
**"Relevance of Gandhian Thoughts at Present Era"**

## CERTIFICATE

This is to certify that

~~Dr.~~/~~Ms.~~/Mr. Vasant Nanarao Patange

of A.R.B. Garud college, Shedurni, Tq. Jamner Dist - Jalgaon

has actively participated/Presented a paper entitled महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता

in the One Day National Interdisciplinary Seminar On **"Relevance of Gandhian Thoughts at Present Era"** organized by Gandhian Study Centre, Toshniwal Arts, Commerce & Science College, Sengaon Tq. Sengaon Dist. Hingoli on Tuesday, 14th March 2017.

| | | |
|---|---|---|
| Dr. S.M.Vadgule | Dr. P.B. Patil | Prof. S.G. Talnikar |
| Principal | Convener | Organizing Secretary |

Scanned by CamScanner